# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/लोकशाही पंधरवडा२०१९-२०/ 5424 दिनांक :- 24 DEC 2019

**स्मरणपत्रः- १**

प्रति,

संचालक/प्राचार्य

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत संस्था.

विषय :- दिनांक २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रवारी २०१९ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करणे बाबत..

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्रमांक १६ /संकीर्ण/२०१८/शा ३१३१ दिनांक १०/१२/२०१८

२. या कार्यालयाचे पत्र क्र जा.क्र.तंशिविकापु/विि/२०१८/१० दिनांक ३१/१२/२०१८

३. संचालनालयाचे पत्र क्रमांक १६ /संकीर्ण/२०१९/शा ६८ दिनांक २५/०२/२०१९

४. संचालनालयाचे पत्र क्रमांक १६ /संकीर्ण/२०१९/३४० दिनांक ०६/१२/२०१९

दिनांक २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रवारी २०१९ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करणेबाबत राज्य निवडणूक आयोगाने सर्व विभागीय आयुक्तांना संदर्भिय पत्रान्वये **"लोकशाही पंधरवडा"** साजरा करणे बाबत सुचित केलेले होते..

संदर्भ क्र २ अन्वये या पूर्वी कार्यालयाच्या संकेतस्थळावर सदर पत्र प्रदर्शित करण्यात आले होते. त्या अनुषगाने या कार्यालयास २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रवारी २०१९ या कालावधीत **"लोकशाही पंधरवडा"** साजरा केल्या बाबतीची माहिती अद्याप अप्राप्त असल्याने माहिती त्वरीत पाठविण्यात यावी.

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत :- संदर्भिय पत्र

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा क्र. तंशिविकापु/विवि/२०१८/ 10 दिनांक ३१/१२/२०१८

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- दिनांक २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रवारी २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करणे बाबत..

संदर्भ :-१.संचालनालयाचे पत्र १६/संकीर्ण/२०१८/शा ३१३१ दिनांक १०/१२/२०१८

२. शासनाचे पत्र क्र संकीर्ण २०१८/प्र.क्र ७७/१८ ) ,दि ०३/१२/२०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की , राज्य निवडणूक आयोगाने सर्व विभागीय आयुक्तांना संदर्भिय पत्रान्वये ' "लोकशाही पंधरवडा" साजरा करणे बाबत सुचित केलेले आहे.

तरी आपणास सूचित करण्यात येते की दिनांक **२६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रवारी २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा"** साजरा करावा.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत :- संदर्भिय पत्र

प्रत :- प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे "दिनांक २६ जानेवारी, २०१८ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करणेबाबत." या विषयाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/(प्र.क्र.७७/१८)/समन्वय, दिनांक ३.१२.२०१८ ची प्रत सोबत जोडत आहे.

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१८/शा३१३१
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : १०/१२/२०१८

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.

वि.वि.
१८/१२

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- कार्यासन क्रमांक १२, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
18 DEC 2018
आवक क्र. 11842

महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण-२०१८/(प्र.क्र.७७/१८)/समन्वय,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०३.१२.२०१८.

प्रति,

सर्व सह/उप सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**विषय :** दि.२६ जाने,२०१८ ते दि.१० फेब्रु,२०१८ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करणेबाबत-

**संदर्भ :** सहाय्यक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्र. रानिआ/रापनो-२०१७/लोकशाही पंधरवडा/प्र. क्र. १४/का-११, दि.२९.११.२०१८ चे पत्र.

**महोदय/महोदया,**

दि. २६ जानेवारी, २०१८ ते दि. १० फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत **"लोकशाही पंधरवडा"** साजरा करण्यात यावा असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सर्व विभागीय आयुक्तांना संदर्भिय पत्रान्वये दिले आहेत. सदर पत्राची प्रत माहिती तथा पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

आपला,
03.12.2018
(प्र. ह. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**सहपत्र :** वरीलप्रमाणे.

**प्रत,**

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
विशेष कार्यकारी अधिकारी तथा, संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवायोजना कार्यालय, मुंबई

6/12/18

आ.3.1.31
5/12/18
९६

का
१६

5/12

ई-मेलद्वारे

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र:रानिआ/रापनों-२०१७/लोकशाही पंधरवडा/प्र.क्र.१४/का-११
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २९ नोव्हेंबर, २०१८

प्रति,
मा.विभागीय आयुक्त (सर्व),

विषय :- दि. २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याबाबत.

संदर्भ :- १. आयोगाचे क्र.रानिआ/रापनों/२०१७/प्र.क्र.१४/का-११ दि. ०६ जानेवारी, २०१८ रोजीचे आदेश.
२. आयोगाचे दि. ०९ ऑगस्ट, २०१८ रोजीचे पत्र
३. वरील विषयाबाबत दि. १८ सप्टेंबर, २०१८ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे झालेली बैठक.

महोदय,

भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीस २५ पूर्ण झाल्याच्या निमित्ताने नोव्हेंबर-२०१७ पासुन "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर राष्ट्रीय परिषद, विभागीय परिषदांसह ऑक्टोबर-२०१८ अखेरीस आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन मा.राज्यपाल व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत राज्य निवडणूक आयोगाकडून करण्यात आलेले आहे.

२. वरिल सर्व परिषदांमध्ये मान्यवरांनी मतदारांना मतदार जागृतीसंदर्भात लोकशाहीचे निरंतर शिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे. या परिषदांमध्ये विविध वक्त्यांनी व्यक्त केलेले विचार व सूचना लक्षात घेऊन तसेच लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त व काही जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अहवाल तसेच यासंदर्भात दि. १८ सप्टेंबर, २०१८ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित केलेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दि. २६ जानेवारी, २०१९ ते १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत विभाग, जिल्हा तसेच तालुका पातळीवर साजरा करण्यात यावयाच्या लोकशाही पंधरवड्यामध्ये "जागरुक मतदार, लोकशाहीचा आधार!" हा विषय (Theme) आधार मानून लोक जागृतीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

(अ) उक्त कालावधी स्थानिक पातळीवर लोकशाही पंधरवडा साजरा करताना आयोगाने दि. ०६ जानेवारी, २०१८ रोजी निर्गमित केलेल्या स्थायी आदेशातील निर्देशांचे पालन करावे.

(ब) या व्यतिरिक्त आपणाकडून तसेच जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालातील खालील नावीन्यपूर्ण कल्पना राबण्याविण्यात याव्यात:-

(१) महाविद्यालयांमध्ये प्रती वर्षी मतदार नोंदणी मोहिमेच्या वेळी मतदार नोंदणी करणाऱ्या पहिल्या शंभर विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देऊन पुरस्कृत करणे.

(२) १८ व १९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची निश्चिती करून त्यांचे नाव मतदार यादीत अंतर्भूत करण्यासंदर्भात जिल्हा निवडणूक कार्यालयाशी महाविद्यालयांनी संपर्क साधणे.

(३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून शाळेच्या कंपाऊंड वॉलसह मुख्य मार्गिका, शहरातील दळणवळणाच्या प्रमुख ठिकाणी (उदा. रेल्वे व पादचारी पूल इ.) मतदार जागृतीबाबत आकर्षक सचित्र संदेश रंगविणे.

(४) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जनरल बॉडी सभेमध्ये निवडून येणाऱ्या रहिवाशांनी मतदार नोंदणी/ लगतच्या निवडणुकीत मतदान केले आहे का? याबाबत विचारणा करणारा मुद्दा नामनिर्देशनपत्रात अंतर्भूत करणे.

(५) २६ जानेवारीसह सर्व प्रमुख दिवशी लोकप्रतिनिधी/ प्रमुख वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीत-कमी ३ ते ४ वाक्ये अंतर्भूत करणे.

भाषणामध्ये अंतर्भूत करावयाचा परिच्छेद: "आपण साजरा करीत असलेल्या प्रजासत्ताक दिन हा लोकशाहीचा उत्सव असून विविध प्रयत्नांमुळे आपली लोकशाही अधिकाधिक मजबूत होत आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाची कास धरणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधींचे १५० वे जयंती वर्ष आहे तर त्यांच्या स्वप्नाची पूर्तता करणाऱ्या ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे, हे लक्षात घेता या वर्षामध्ये व त्यापुढे होणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये सर्व मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्य भावनेतून सहभाग घेणे आहे. तसेच स्वत:बरोबर इतर सहकार्यांनाही मतदानाच्या कर्तव्यासाठी प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे".

६) आयोगाने केलेल्या खालील निवडणूक सुधारणांबाबत प्रसिध्दी देणे :-

- निवडणूक प्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकाधिक पारदर्शक बनविली.
- नामनिर्देशनपत्रासोबत शपथपत्र व उत्पन्नाचा गोषवारा देणे आवश्यक केले.
- याचबरोबर उमेदवाराच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीविषयक माहिती मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आली.
- अक्षम नोंदणीकृत राजकीय पक्षांची नोंदणी रद्द केली.

- True Voters व COP यासारख्या मोबाईल ॲपची निर्मिती केली जेणेकरून उमेदवार व मतदार यांच्या सोयीबरोबरच आदर्श आचारसंहितेचे स्थानिक पातळीवर कोटेकोरपणे पालन करता येणे शक्य होईल.
- NOTA ला सर्वाधिक मते पडल्यास अशा ठिकाणी फेर निवडणूक घेणे.
- राजकीय पक्षांनी निवडणूकीच्यावेळी दिलेल्या आश्वासनांच्या पुर्ततेसंदर्भात जनतेसमोर दरवर्षी अहवाल ठेवावा.
- टपाली मतपत्रिका - देशाच्या सीमेवर सैन्यात काम करणाऱ्या जवानांनाही मतदानाचा अधिकार प्राप्त.
- प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दीच्या टप्प्यांवरच मतदार यादीसाठी विधानसभेचा ग्राह्य धरण्यात येणारा दिनांक घोषित करण्यात येत असल्याने नव्या मतदारांना मतदार यादीत नोंदणीसाठी पूर्वसूचना मिळते.

(७) आपल्या कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी संस्था उदा. "Lions Club, Rotary Club" यांच्या सहकार्याने मतदार जागृती मोहीम राबविणे.

(८) मा. राज्य निवडणूक आयोग हे शासनापेक्षा स्वतंत्र असल्याचे व त्याबाबतची सविस्तर माहिती वृत्तपत्र व साप्ताहीक यामध्ये प्रसिध्द करणे.

(९) व्यापारी, उद्योगपती यांची बैठक घेऊन मतदार यादी जागृती अभियानाची व्यापक प्रसिध्दी करण्यासाठी त्यांचे सहकार्य उपलब्ध करुन घ्यावे.

(१०) मतदान केंद्रातील सर्व सोयी-सुविधांची तपासणी करणे व यासाठी निधी आवश्यक असल्यास संबंधीत यंत्रणेकडे पत्राद्वारे तातडीने पाठपुरावा करणे.

(११) प्रत्येक जिल्ह्यातील मोठ्या आकाराच्या (१८ सदस्यीय) किमान २५ ग्रामपंचायतींमध्ये "लोकशाही निवडणूका व सुशासन" या विषयाचे किमान १० होर्डिंग्ज बॅनर्स लावण्यात यावेत, तसेच या ग्रामपंचायतींसह इतर ग्रामपंचायतींच्या दर्शनी ठिकाणी (प्राथमीक आरोग्य केंद्र, बस स्टॅंड, रेल्वे स्टेशन, बाजारपेठा इ.) पोस्टर, कापडी फलक लावण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांना निर्देशित करावे.

(१२) स्थानिक टिवी केबलवर तसेच रेडिओ चॅनलवर किमान ३० सेकंदाची "लोकशाही निवडणूक व सुशासन" या विषयावर जिंगल्स तयार करून ते २६ जानेवारी, ते १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत प्रसारीत करणे.

उदा: १) "जागरूक नागरिक मी भारताचा.... हक्क बजावीन मतदानाच॥"

२) "माझा देश माझी लोकशाही... टिकविन ती लावून बोटाला शाई!"

(१३) लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे काळजी घेणे, तसेच निवडणुकांबाबत उपाययोजना या विषयावर एक दिवसाचे चर्चासत्र घेणे.

(१४) मतदार यादीत महिला मतदारांची टक्केवारी कमी आहे अशा मतदार केंद्रांचा शोध घेऊन त्याठिकाणी महिला मतदारांचे नाव नोंदणीकरीता विशेष मोहिम राबविण्यात यावी.

(१५) ग्रामीण भागात निवडणूकीचे महत्व पटवून देण्यासाठी व निवडणुकीची टक्केवारी वाढविण्यासाठी "चुनाव पाठशाला" आयोजित करणे.

३. सदर कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत पर्याप्त कालावधी उपलब्ध असल्याने या कार्यक्रमाचे परिपूर्ण नियोजन करून स्थानिक पातळीवर यशस्वी करण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागांच्या यंत्रणांना कार्यान्वित करावे. तसेच या कामी विभागीय व जिल्हा पातळीवर कार्यक्षम नोडल अधिकाऱ्यांची त्वरित नियुक्ती करून त्यांचा तपशील (नाव, पद, कार्यक्षेत्र, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी) आयोगास ई-मेलद्वारे दि.१० डिसेंबर २०१८ पर्यंत सादर करावा.

४. वरील मुद्यांसंदर्भात आपल्या मार्गदर्शनार्थ प्रसिध्दी साहित्याचे नमुने आयोगाकडूनही तयार करण्यात येत असून ते आपणास ई-मेलद्वारे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. तसेच या कार्यक्रमासंदर्भात आपणाकडून करण्यात येत असलेल्या कामगिरीचा आढावा मंगळवार दि.११ डिसेंबर, २०१८ रोजी मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात येणार आहे.

६. तसेच लोकशाही पंधरवड्यादरम्यान विभागीय/ जिल्हा/ तालुका पातळीवर साजऱ्या करण्यात येणाऱ्या निवडक कार्यक्रमांना मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्यासह आयोगातील वरिष्ठ अधिकारी स्वत: उपस्थित राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपली,

२७/११/१८

(आरती सरवदे-आहेर)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी:-

१. सचिव (सर्व विभाग)
२. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
३. जिल्हाधिकारी (सर्व)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. सर्व विद्यापीठे
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.